॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

वाईट बातमीला पंख असतात तर
शुभ बातमीला पायच नसतात.

अहिल्यानगर | शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३१८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com



पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेला २.१७ कोटीचा नफा

पान क्र. २ वर



वासुंदे, पळशी, खडकवाडी भागात घरांचे पत्रे उडाले

पान क्र. ३ वर



झगडे फाटा-तालुका हद्द रस्ता सिमेंट काँक्रीटचा करणार : आ. काळे

पान क्र. ४ वर

## महागाई नियंत्रणासाठी ४० उत्पादनांवरील आयात शुल्क हटवले

### ऊर्जा संकटाच्या काळात सरकारच्या निर्णयाने दरवाढ टळली । केंद्राकडून यादी जाहीर; सूट ३० जूनपर्यंत लागू

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**
पश्चिम आशियात अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला १ महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. या युद्धामुळे जगभरात महागाईचा धोका वाढला आहे. दरम्यान, भारत सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सरकारने मोठा निर्णय घेत पेट्रोकेमिकल उत्पादनांसह ४० उत्पादनांवरील आयात शुल्क पूर्णपणे रद्द केले आहे. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होणे आणि कच्च्या तेलाच्या किंमतीत जोरदार वाढ लक्षात घेता देशातील वस्तूंचा तुटवडा आणि महागाई रोखण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. ही सूट ३० जूनपर्यंत लागू राहणार आहे.

सरकारने सीमा शुल्क हटविलेल्या उत्पादनांमध्ये प्रामुख्याने नॅहायड्रस, अमोनिया, मिथेनॉल, टोल्यून, स्टायरीन आणि विनाइल क्लोराईड मोनोमर्स यासारख्या आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणात उत्पादनात वापरल्या जार्णा या पॉलिथिलीन आणि पॉलीप्रोपाइलीन सारख्या श्रेणींनाही सूट देण्यात आली आहे. यासह, फार्मास्युटिकल्स आणि ऑटोमोटिव्ह पार्ट्सच्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणाऱ्या इपॉक्सी रेजिन, पॉलीयुरेथेन आणि फॉर्मेल्डिहाइड डेरिव्हेटिव्ह्जचा देखील या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका व इस्रायलने संयुक्तपणे इराणवर हल्ला चढविला, त्यानंतर संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किंमती सुमारे ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. भारत आपल्या



गरजेचा मोठा भाग मध्यपूर्वेतून आयात करतो. अशा परिस्थितीत त्याच्यासाठी ही चिंताजनक परिस्थिती होती. हा दबाव कमी करण्यासाठी सरकारने गेल्या आठवड्यातही काही मोठे निर्णय घेतले होते.

पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रतिलिटर १० रुपयांनी कपात करण्यात आली आहे. सध्या पेट्रोलवर ३ रुपये प्रति लिटर उत्पादन शुल्क आहे, तर डिझेलवर ते मुक्त ठेवण्यात आले आहे. या निर्णयामुळे कच्चा माल स्वस्त झाल्यामुळे उत्पादन खर्चात घट होईल, ज्याचा परिणाम अंतिम उत्पादनांच्या किमतींवर होऊ शकतो. त्यामुळे महागाई नियंत्रणात ठेवण्यास मदत होईल, असा सरकारचा अंदाज आहे.

### आयात शुल्क रद्द केलेल्या ४० वस्तुंची यादी

■ **महत्त्वाचे गॅस आणि रसायने** : १. मेथॅनॉल, २. निर्जल अमोनिया, ३. स्टायरीन, ४. विनाइल एसीटेट मोनोमर, ५. एसेटिक ॲसिड, ६. फिनॉल, ७. टोल्युइन, ८. एसीटोन.

■ **प्लास्टिक आणि पॉलिमर्स** : ९. पॉली प्रोपायलीन, १०. पीव्हीसी, ११. पॉलीइथिलीन, १२. पॉलीस्टायरीन, १३. पॉलीकार्बोनेट, १४. पॉलीयुरेथेन, १५. पेट, १६. एबीएस, १७. इपॉक्सी रेझिन्स.

■ **औद्योगिक कच्चा माल** : १८. पीटीए, १९. एमईजी, २०. अमोनियम नायट्रेट, २१. इथिलीन डायक्लोराइड, २२. कॅप्रोलेक्टम, २३. ॲडिपिक ॲसिड, २४. मॅलेइक अनहाइड्राइड, २५. प्थॅलिक अनहाइड्राइड, २६. आयसोसायनेट्स

■ **इतर रसायने आणि रबर** : २७. पॉलीब्यु–टाडाइन, २८. इथिलबेंझिन, २९. प्रोपाइलिन ग्लायकोल, ३०. टायटॅनियम डायऑक्साइड, ३१. कार्बन ब्लॅक, ३२. एनिलिन, ३३. सिंथेटिक रबर, ३४. सल्फ्यूरिक ॲसिड, ३५. हायड्रोक्लोरिक ॲसिड, ३६. कॉस्टिक सोडा, ३७. सोडा अॅश, ३८. फॉर्मल्डिहाइड, ३९.प्लॅस्टिसायझर्स, ४०. विविध सॉल्व्हेंट्स

## SPOT NEWS

### जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट'व 'येलो अलर्ट'चा इशारा

**● अहिल्यानगर –** भारतीय हवामान विभाग यांनी निर्गमित केलेल्या इशाऱ्यानुसार जिल्ह्यात दि. २ व ३ एप्रिल २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळे, सोसाट्याच्या वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट'जारी करण्यात आला आहे. तसेच दि. ४ एप्रिल २०२६ रोजी वीजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस व जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट'देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मेघगर्जना, वीजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली थांबू नये; सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळादरम्यान कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये; विद्युतवाहक वस्तूंना स्पर्श टाळावा. मोकळी मैदाने, टॉवर्स, विद्युत खांब, धातूची कुंपणे, ट्रान्सफॉर्मर यांपासून दूर राहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) जवळ थांबू नये; कोसळण्याचा धोका संभवतो. मोकळ्या जागेत अडकले असल्यास गुडघ्यावर बसून डोके खाली झाकून घ्यावे व जमिनीशी कमी संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांनी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान टाळण्यासाठी शेतीमालाचे योग्य नियोजन करावे. बाजारात आणलेला किंवा साठवलेला शेतीमाल सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शक्तिपीठ महामार्गाचा आराखडा पुन्हा बदलला

**● मुंबई –** गेल्या काही काळापासून वादाचा मुद्दा राहिलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या आरेखनात पुन्हा बदल करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतून जाणारा हा मार्ग आता सातारा जिल्ह्यातूनही जाणार आहे. त्यामुळे ८०२ किलोमीटरच्या या मार्गाची लांबी आता ८५६ किलोमीटरवर गेली आहे. नागपूर–गोवा शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग म्हणजेच महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्गाच्या आखणीला फेब्रुवारी २०२४मध्ये मान्यता देण्यात आली होती. या आखणीनुसार महामार्गासाठी महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ नुसार भूसंपादन करण्याच्या अनुषंगाने प्रसिद्ध केलेली प्रारंभिक अधिसूचना कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, करवीर, हातकणंगले, कागल, भूदरगड, आजरा तालुक्यांतील मंजूर आखणीसाठी ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये रद्द करण्यात आली आहे. त्यानंतर ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पवनार ते सांगली दरम्यानची आखणी कायम ठेवण्यास मान्यता देऊन, उर्वरित आखणीचे उपलब्ध सर्व पर्याय व संभाव्य पर्याय महाराष्ट्र राज्य रस्ता विकास महामंडळाने तपासून सरकारला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

## भोंदू खरातला पुन्हा सात दिवसांची पोलीस कोठडी

**● नाशिक । वीरभूमी –**
नाशिक सत्र न्यायालयाने गुरुवारी स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याला दुसऱ्या बलात्कार प्रकरणात सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणात त्याच्यावर २०२० पासून धार्मिक विधींच्या नावाखाली एका महिलेचे अनेक वेळा लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे.

दुसऱ्या बलात्कार प्रकरणात विशेष तपास पथकाने बुधवारी अटक केलेल्या खरातला तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुख्य न्यायदंडाधिकारी बी. एन. इचपुरानी यांच्यासमोर हजर करण्यात आले, ज्यांनी त्याला ८ एप्रिलपर्यंत एसआयटी कोठडीत पाठवले. पहिल्या

बलात्कार प्रकरणात 'गॉडमॅन' म्हणून ओळखला जाणारा, माजी मर्चेंट नेव्ही अधिकारी, १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत होता आणि नाशिक रोड सेंट्रल जेलमध्ये होता, जिथून एसआयटीने त्याला ताब्यात घेतले.

नाशिक जिल्ह्यातील सरकारवाडा पोलीस ठाण्यात एका ३५ वर्षीय महिलेने बलात्काराची तक्रार दाखल केल्यानंतर खरातला १७ मार्च रोजी अटक करण्यात आली. त्यानुसार, त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ आणि



महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानवीय, दुष्ट आणि अघोरी प्रथा आणि काळी जादू प्रतिबंध आणि निर्मूलन कायदा,

२०१३ च्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या प्रकरणातील पीडिता २०१३ पासून खरातच्या संपर्कात होती, जेव्हा ती तिचे लग्न ठरवण्यासाठी एका नातेवाईकाच्या सल्ल्यानुसार त्याला पहिल्यांदा भेटली होती. तक्रारीनुसार, लग्नानंतरही तो तिच्या कौटुंबिक समस्यांवर तोडगा काढण्याच्या बहाण्याने त्या महिलेच्या संपर्कात होता आणि तिचे लैंगिक शोषण करत होता.

दोन मुले मात्र पतीपासून विभक्त लग्नापासून दोन मुले असलेली ती महिला, नंतर वैवाहिक मतभेदांमुळे आपल्या पतीपासून विभक्त झाली. जेव्हा तिने तिच्या भविष्याबद्दल आणि

पुनर्विवाहाच्या शक्यतांबद्दल चर्चा करण्यासाठी खरातशी पुन्हा संपर्क साधला, तेव्हा त्याने तिचे लैंगिक शोषण करण्यास सुरुवात केली, असा आरोप त्या महिलेने तक्रारीत केला आहे. त्याने तिला आपल्या कार्यालयात बोलावून धार्मिक विधींच्या नावाखाली तिच्यावर बलात्कार केला. तक्रारीनुसार, ती गरोदर झाल्यावर त्याने तिला गोळ्या देऊन गर्भपात करण्यास भाग पाडले. खरात फेब्रुवारी २०२० पासून त्या महिलेचे लैंगिक शोषण करत होता आणि तिने विरोध केल्यास तिचे व तिच्या मुलांचे आयुष्य उद्धस्त करण्याची धमकी देत होता, असे त्यात म्हटले आहे.

भोंदू बाबा खरात प्रकरणात सरकारी वकील म्हणून कार्य करणारे अजय मिसर यांनी वाढत्या कामाच्या ताणामुळे खरात यांचा खटला लढविण्यास नकार दिला आहे. त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे चांगलीच खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणात मिसर यांनी अशी भूमिका का घेतली याबाबत उलट सुलट चर्चा सुरू असून त्यांच्यावर कोणाचा दबाव होता का अशी चर्चा सध्या नाशिकच्या प्रशासकीय आणि न्यायालयीन वर्तुळात सुरू आहे.

## राहुरी विधानसभेसाठी तीन दिवसाअखेर एक अर्ज दाखल; १०३ अर्जांची विक्री

**● राहुरी । वीरभूमी –**
राहुरी विधानसभा मतदारसंघाच्यापोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तीसऱ्या दिवसाअखेर एक अर्ज दाखल झाला तर आतापर्यंत एकूण ४९ इच्छुकांनी १०३ उमेदवारी अर्जांची खरेदी केली आहे.

त्यातच आता काँग्रेस पक्षानेही उमेदवार देण्याची घोषणा केल्याने निवडणुकीत चुरस निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निवडणूक प्रक्रियेअंतर्गत दि. ३० मार्च २०२६ रोजी १५ व्यक्तींनी ३१ अर्जांची खरेदी केली होती. त्यानंतर दि. १ एप्रिल रोजी २१ इच्छुकांनी ४० अर्ज घेतले. तर दि. २ एप्रिल रोजी १३ व्यक्तींनी ३२ अर्जांची खरेदी केली आहे. एकूण तीन दिवसांत ४९ व्यक्तींनी १०३ अर्ज घेतल्याने निवडणुकीबाबतची उत्सुकता आणि रंगत वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र, अद्यापपर्यंत केवळ एकच अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल झाला असून अद्याप कोणत्याही राजकीय पक्षाच्या अधिकृत उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. आगामी दिवसांत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेग घेण्याची शक्यता असून, प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष इच्छुकांच्या हालचालींनाही वेग आला आहे. त्यामुळे राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणूक चुरशीची ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. दरम्यान, युवानेते अक्षय कर्डिले यांना भाजपाकडून उमेदवारी जाहीर झाली असून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे अपक्ष उमेदवारी करणार असल्याचे खात्रीलायक समजते.

मात्र याबाबत अधिकृत घोषणा झाली नसल्याने संभ्रम कायम आहे. महाविकास आघाडीचा मित्रपक्ष असलेल्या काँग्रेस पक्षानेही आपला उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवण्यासाठी हलचाली सुरू केल्याची माहिती एका पदाधिकार्याने दिली आहे. यामुळे राहुरी विधानसभेची पोटनिवडणूक ही बहुरंगी होण्याचे चिन्हे दिसत आहे. तसेच महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या इच्छूक उमेदवारानेही अर्ज नेल्याने शिंदे गट पूर्ण ताकदीने ही निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे.

### तनपुरेंच्या भूमिकेकडे नजरा

■ माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी काही दिवसापुर्वी भगवा हातात घेत निवडणुकीची तयारी केली होती. मात्र भाजपाने अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिल्याने तनपुरे काय करणार असा प्रश्न आहे. मात्र अद्याप तनपुरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नसली तरी ते अपक्ष उमेदवारी करु शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## संगमनेरात महिलांनी हनुमानाचा रथ ओढण्याची परंपरा आजही कायम

### हजारो महिलांचा सहभाग । शेकडो वर्षाची परंपरा कायम

**● संगमनेर । वीरभूमी–**
शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात गुरुवारी (दि.२) श्री हनुमान जयंतीनिमित्त उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विशेषतः शहरातील हनुमान जन्मोत्सवाला आगळे–वेगळे महत्त्व आहे. यादिवशी चंद्रशेखर चौकातील प्रभू श्रीराम मंदिरापासून हनुमान विजयरथ निघतो. १९२९ पासून रथ ओढण्याचा मान महिलांना दिला जातो. ब्रिटीश काळापासून चालत आलेली ही परंपरा संगमनेरकरांनी जपली असून, यंदाही शेकडो महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रथ ओढला.

यावेळी आमदार अमोल खताळ, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक समीर बारवकर आदी उपस्थित होते. पोलिसांनी मिरवणुकीत आणलेला भगवा ध्वज रथावर लावल्यानंतर रथोत्सवाला सुरुवात झाली. श्रीराम मंदिरापासून चंद्रशेखर चौकापर्यंत महिलांनी परंपरेप्रमाणे रथ ओढला.

नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, एकविरा फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. जयश्री थोरात, सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ, माजी नगरसेविका शोभा परदेशी, अश्विनी अवसक, भाजप शहराध्यक्षा पायल ताजणे यांच्यासह शेकडो महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

विजय रथोत्सवावर १९२७ ते १९२९ या सलग तीन वर्षांत ब्रिटिशांनी बंदी घातली होती. १९२७ मध्ये अडवलेला रथ पाच दिवसांनी, तर १९२८ मध्ये दोन महिन्यांनंतर पूजा करून पुढे नेण्यात आला. २३ एप्रिल, १९२९ रोजी हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रथोत्सवावर पुन्हा बंदी घालण्यात आली होती. जन्मोत्सवाच्या पहाटे मंदिर परिसरासह रथोत्सव मार्गावर शेकडो पोलीस तैनात होते. सकाळी मंदिरातील धार्मिक कार्यक्रम पार पडल्यानंतर, रथात दोन लहान मुलींनी हनुमानाची मूर्ती ठेवण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांनी ती मूर्ती पुन्हा मंदिरात नेऊन ठेवली.

पोलीस रथोत्सवाला करत असलेला विरोध पाहून अनेकजण घरी गेले. परंतु अचानक सुमारे २०० ते २५० महिलांनी एकत्र येऊन रथाचा ताबा घेतला. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरताच मंदिर परिसरात महिलांची संख्या वाढली. पोलिसांनी त्यांच्याशी अनेक युक्तिवाद केले, भीती दाखविली, अटक करण्याची व खटले भरण्याची धमकी दिली. परंतु आदिशक्तीचे रूप धारण केलेल्या महिलांनी ठामपणे रथ पुढे नेण्याचा निर्धार केला असा याचा इतिहास आहे. यंदाही चंद्रशेखर चौक, रंगार गल्ली, कॅप्टन लक्ष्मी चौक, लालबहादूर शास्त्री चौक, नगरपालिका, चावडी चौक, जुना कटारिया बाजारपेठ, तेलीखुंट, नेहरू चौक या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. अखेरीस मोठ्या मारुती मंदिराजवळ या सोहळ्याची सांगता झाली. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समितीने परिश्रम घेतले.



SPOT NEWS

## राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत नगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत अहिल्यानगर शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. अहिल्यानगर सिटी रायफल अँण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या तब्बल ८ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात मुग्धा राजापुरे, किर्ती चक्रवर्ती, कार्तिकी कोकाटे, प्रिशा मुनोत आणि राजलक्ष्मी घडेकर यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर आणि स्वाती काळे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच खेळाडूंना हे यश मिळवता आले आहे. या यशाबद्दल खेळाडूंवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आमदार संग्राम जगताप, खासदार नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## हनुमान जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

हनुमान जयंतीच्या पावन निमित्ताने अष्टविनायक ब्लड बँक व हनुमान मंदिर लक्ष्मी कारंजा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देणारा हा उपक्रम ठरला. शिबिराचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. अष्टविनायक ब्लड बँकेच्या तज्ञ पथकाने रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षितरीत्या रक्तसंकलन केले. रक्तदात्यांना आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांच्यात समाधानाचे वातावरण दिसून आले. या उपक्रमात अष्टविनायक ब्लड बँकेचे नरेंद्र मेरगु, जितेंद्र पलीकुंडवार, वनिता श्रीपत, नलिनी मुसळे, समीक्षा टाके, वंदना देसाई आणि गुलाब शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मंडळाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. हनुमान जयंतीसारख्या पवित्र दिवशी रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली.

# पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेला २.१७ कोटीचा नफा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

सहकारी पतसंस्था क्षेत्रात आपल्या पारदर्शक कारभाराने आणि विश्वासार्हतेने स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या कोपरगाव तालुक्यातील पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब नागरी सहकारी पतसंस्थेने ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे व कारखान्याचे चेअरमन आ.आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली नेत्रदीपक कामगिरी केली आहे. २०२५–२६ आर्थिक वर्षात पतसंस्थेला २ कोटी १७ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला असून सर्व तरतुदी करून निव्वळ नफा १ कोटी १४ लाख रुपये इतका झाला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी दिली आहे.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आलेख मांडताना चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी सांगितले की, सरत्या आर्थिक वर्षात संस्थेच्या ठेवींमध्ये तब्बल २१.६० टक्क्यांची मोठी वाढ झाली असून एकूण ठेवींचा आकडा ५३ कोटी २४ लाखांवर पोहोचला आहे. संस्थेने कर्ज वाटपाचे धोरणी संतुलित ठेवले असून आजमितीस ४० कोटी ६८ लाख रुपयांचे कर्ज गरजवंतांना वितरण करण्यात आले आहे. संस्थेचे आर्थिक पाया मजबूत असल्याचे सिद्ध करणारे महत्त्वाचे गमक म्हणजे संस्थेकडे राखीव निधी व इतर फंड एकूण १३ कोटी ७२ लाख रुपयांचे आहे. तसेच संस्थेचे वसूल भागभांडवल १ कोटी ३३ लाख रुपये असून संस्थेची ३० कोटी ३३ लाख रुपयांची भरीव गुंतवणूक आहे.

बँकिंग क्षेत्रात एनपीए कर्जाचे प्रमाण हा चिंतेचा विषय असताना देखील पतसंस्थेने मात्र यावर प्रभावी नियंत्रण मिळवले आहे. संस्थेचे थकबाकीचे प्रमाण केवळ १.३४ टक्के असून ढोबळ एनपीए ३.५२ टक्के आहे. संस्थेने आपला निव्वळ एनपीए सातत्याने ०% राखण्याची परंपरा याही वर्षी कायम ठेवली आहे. संस्थेच्या या उत्कृष्ट कारभाराची दखल घेत आजवर संस्थेला ब्ल्यु रिबीन आणि दीपस्तंभ यांसारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

पतसंस्थेच्या यशाबद्दल माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांनी संस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन, सर्व संचालक मंडळ, मुख्य व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. सहकार तत्त्वाचे पालन करत सभासदांचे हित जोपासल्याबद्दल त्यांनी संस्थेचे कौतुक करून आगामी आर्थिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



सहकारी पतसंस्था चळवळीत सर्वसामान्य ग्राहक, कर्जदार, ठेवीदार आणि सभासद यांच्या विश्वासास पात्र ठरत संस्था सातत्याने पुढे जात आहे. माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेला भक्कम दिशा मिळाली असून संस्था प्रगतीच्या मार्गावर ठामपणे मार्गक्रमण करीत आहे. संस्थेने डिजिटल प्रणालीचा अवलंब करून ग्राहकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पारदर्शक व्यवहारातून संस्थेचा स्वतःचा एक विश्वासू ग्राहकवर्ग तयार झाला आहे. या ग्राहकांचा विश्वास जपत यापुढील काळातही संस्था कायम प्रगती साधत राहील.

– **मंगेश देशमुख,** मुख्य व्यवस्थापक

## गॅस दरवाढीवर ऑटो रिक्षा-टॅक्सी संघटनेच्या मोर्च्यानंतर पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



एलपीजी गॅस दरवाढीविरोधात अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक–मालक संघटनेने काढलेल्या मोर्च्याची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर पुरवठा अधिकारी हेमा बढे यांनी संघटनेचे पदाधिकारी व गॅस कंपन्यांच्या सेल्स मॅनेजर यांची बैठक घेऊन महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

फेब्रुवारी २०२६ पूर्वी ४२ रुपये ५० पैसे प्रति लिटर असलेला एलपीजी गॅस दर युद्धानंतर वाढत जाऊन सध्या १०० रुपयांपर्यंत पोहोचल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या दरवाढीमुळे रिक्षा चालकांचे आर्थिक गणित कोलमडले असून व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गॅस कंपन्यांकडून मनमानी दरवाढ होत असल्याचा आरोप करत, वाहनांमध्ये गॅस भरताना कमी ऍव्हरेज मिळत असल्याने हेराफेरी होत असल्याचीही तक्रार मांडली. रिक्षा चालक दिवसभर कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, मात्र वाढत्या दरांमुळे त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला आहे.

बैठकीदरम्यान पुरवठा अधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कंपनीकडून ज्या दराने गॅस व पेट्रोल पुरवठा होतो, त्याच दराने ग्राहकांना वितरण करावे. दरफलक (रेट बोर्ड) पंपावर दर्शनीय ठिकाणी लावावा. प्रत्येक ग्राहकाला गॅस भरण्यानंतर बिल देणे अनिवार्य राहील. दरम्यान, संघटनेच्या वतीने शहरातील एचपी व इंडियन ऑइलचे बंद असलेले गॅस पंप तातडीने सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

या बैठकीस शहर पुरवठा तहसीलदार सपना बहुते, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश तात्या घुले, उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, लतीफ शेख, गणेश आटोळे, नारीस खान, सुधाकर साळवे यांच्यासह मोठ्या संख्येने रिक्षा चालक उपस्थित होते. गॅस दरवाढीवर प्रशासनाची तातडीची कारवाई.

## आरपीआय (गवई)ची नव्याने कार्यकारिणी जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाची शहरातील महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच उत्साहात पार पडली. या बैठकीत शहराची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के व महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. शहर, उपनगर तसेच नगर तालुक्यातील कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बैठकीत बोलताना सुशांत म्हस्के यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी पक्षाची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर जुने व नवीन कार्यकर्ते यांचा समन्वय साधत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून संधी देण्यात आली असून, पक्ष हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून सर्व जाती–धर्माला सोबत घेऊन वाटचाल करतो, असे त्यांनी स्पष्ट केले. नवीन पदाधिकाऱ्यांना एका वर्षाचा कार्यकाळ देण्यात आला असून, त्यांनी प्रभावी काम करून पक्षविस्तार करावा व अधिकाधिक कार्यकर्ते जोडावेत, असे आवाहन करण्यात आले. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय किंवा अत्याचार झाल्यास पक्ष त्याविरोधात आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही म्हस्के यांनी नमूद केले. सध्या जाती–धर्मात भांडण लावण्याचे राजकारण सुरू असून, अशा परिस्थितीत पक्षाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच जिल्हाव्यापी मेळावा आयोजित करण्यात येणार असून, या मेळाव्यासाठी पक्षप्रमुख राजेंद्र गवई उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच युवकांना जिल्ह्यात काम करण्याची मोठी संधी असून, गावागावातील प्रश्न सोडविण्यासाठी युवकांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले. आगामी राहुरी विधानसभा निवडणुकीत पक्षाचा उमेदवार देण्यात येणार असल्याचेही संकेत त्यांनी दिले.

यावेळी दानिश शेख यांनी सांगितले की, आरपीआयच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत काम सुरू आहे. शहरात पक्षाचे कार्य भक्कम झाले असून, चळवळीतील कार्यकर्ते निळ्या झेंड्याखाली एकत्र आले आहेत. सत्ताधारी राजकारणात जाती–धर्मात भांडणे लावून सोयीचे राजकारण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे गोरगरीब जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांनी महिलांच्या विविध प्रश्नांवर पक्षाने सातत्याने आवाज उठविला असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील अनेक प्रकरणांमध्ये महिलांना न्याय मिळवून देण्यात पक्षाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

# शिक्षकांसाठीच्या सी.टी.ई.टी परीक्षा : माझा अनुभव

**गुरूर ब्रम्हा, गुरूर विष्णू**
**गुरूर देवो महेश्वरा**
**गुरू साक्षात परब्रम्ह**
**तस्मै श्री गुरवे नमः**

वय वर्ष ५७ झाले. आता प्रमोशनच्या यादीत नाव येणार व नंतर कळतं की टी.ई. टी.परीक्षा पास असेल तरच प्रमोशन मिळणार.हा कुठला न्याय? आज ३८ वर्ष शिक्षण खात्यात आल्यापासून अगदी प्रामाणिकपणे चिमुकल्यांची सेवा केली आणि करत आहे.अनेक विद्यार्थी घडवले. अनेक विद्यार्थी मोठ– मोठ्या पोस्टवर कार्यरत आहेत. हे विद्यार्थी कुठेही भेटेले तरी नतमस्तक होतात. ही विशेष समाधान देऊन जाणारी बाब आहे.

शासनाचा हा टी.ई.टी.चा निर्णय आमच्या गेल्या अनेक वर्षांच्या सेवेवर अन्याय करणारा वाटतो. वय वर्ष त्रेपन्न (५३) पर्यंतच्या शिक्षकांना (मग सेवा कितीही असो) टी. ई.टी. अनिवार्य, व त्यानंतरच्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी ही परीक्षा देणे अनिवार्य. हा घेतलेला तुघलकी निर्णय आम्हा शिक्षकांवर अन्यायकारक ठरणारा आहे. आमचे चुकले कुठे? नोकरी लागून अनेक वर्षे झाल्यावर ही परीक्षा आमच्यावर लादण्याचे कारण काय? या व अशा विचारांनी मनात काहूर माजले. काय करावे? कसे करावे? कुणाला विचारावे? कुणाकडे दाद मागावी? या प्रश्नांनी मनात विचारांचे थैमान घातले. शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना विचारावे तर तेथे तरी काय आलबेल आहे?

कोणी जर या विरोधात प्रयत्न केले तरी त्यातून काहीच निष्पन्न होत नाही. पैसा, वेळ खूप वाया जातो. या साऱ्यांची जाणीव ठेऊन या वयात आपण ही परीक्षा पास होऊ का? हा यक्ष प्रश्न पुढे आ वासून उभा होता. यातून कसा मार्ग काढावा? हा विचारांचा भुंगा सतत मेंदू पोखरत होता. परीक्षा पास झालेच पाहिजे हा प्रतिष्ठेचा प्रश्न उभा राहिला. आपण शिक्षण खात्यात आलो ते काय कॉपी करून की पैसे भरून? नाही ना! अगदी तावून सुलाखून खणखणीत नाण्यासारखे स्वबळावर व स्वतःच्या बुद्ध्यांकावर शिक्षक झालो.

आता रिटायरमेंट १ वर्षावर आली असताना ही परीक्षा कशासाठी? पण कोण ऐकून घेतोय. वालीच उरला नाही आम्हाला. म्हणतात ना अजब डोक्यातून गजब कल्पना काढणारे, ए.सी.त बसणारे त्यांना काय कळणार आमच्या भावना. निर्णय झाला की झाला. तळागाळातल्या सामान्य लोकांचे ऐकायला त्यांना वेळच नाही.

असो. दरम्यानच्या काळात पहिली टी.ई. टी. परीक्षा झाली. संघटनेच्या लोकांनी परीक्षेच्या विरोधात मोर्चा काढला. मला वाटले सर्व सुरळीत होईल. शासन आपले म्हणणे ऐकून घेईल. त्या गोड समजामध्ये (गैरसमजच) मी परीक्षा दिली नाही. इतरांनी ही परीक्षा दिली. आम्ही आपले निवांत. पुढे सी. टी. ई. टी. आली. बऱ्याच जणांनी फॉर्म भरले. तरीही आम्ही गाफीलच. अगदी शेवटच्या दिवशी शाळेत असताना माझ्या एका हितचिंतक मैत्रिणीचा फोन आला. म्हणाली, अगं! मनू तू फॉर्म भरला की नाही? आज शेवटची मुदत आहे. मी फॉर्म भरलाय तू पण भर.

मी नाही म्हणाले. अग आपण पास होऊ का या वयात? आपल्याला डी. एड सुटून ३९ वर्ष झाले. शिवाय आपले १० वी नंतरचे डी.एड. तर ही परीक्षा सेंट्रल बोर्डाची. संपूर्ण अभ्यासक्रम हिंदीत. कसे व्हायचे? आपण या नवीन मुलांच्या स्पर्धेत टिकू का?

ती म्हणाली, फॉर्म तर भर तू. मग बघू.तिचा फोन ठेवला. व लगेच आमच्या ह्यांना (मी त्यांना साहेब म्हणते) घरी फोन लावला. म्हणाले मला सी.ई.टी. परीक्षेला बसायचे आहे. मी घरी येईपर्यंत माझा फॉर्म भरला गेला पाहिजे. मला दुसरे काही माहीत नाही.साहेब पण थोडे कन्फ्युज झाले; पण आता हिची समजूत काढण्यासाठी फॉर्म तर भरावाच लागेल. साहेबांनाही घाम फुटला. साहेबांनी फॉर्म भरण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे शोधून काढली.फॉर्म भरायला घेतला तर साईटच चालेना. काय करावे ? ही आता काही आपल्याला स्वस्थ बसू देणार नाही. या विचारांनी साहेब पण युद्धपातळीवर कामाला लागले. मुलगा भुषणला फोन केला. मम्मी काही ऐकत नाही. परीक्षेला बसायचेच् म्हणते. फॉर्म भरण्याची आज शेवटची तारीख आहे. फॉर्म भरला जात नाही. तिच्या समाधानासाठी तरी आपल्याला फॉर्म भरावा लागेल. तू भरतो का? नाही हो करता करता भूषणने फॉर्म भरला. अगदी शेवटच्या टप्प्यात माझा फॉर्म सबमिट झाला.

परीक्षेत पास होण्यासाठी सर्वसाधारण गटासाठी ९० मार्क म्हणजेच ६०% हवे होते.कुठलीही सवलत नाही. हा सर्व प्रपंच करण्याचे कारण म्हणजे, बरेच जण मला म्हणाले होते की, मॅडम तुम्ही टी. ई. टी.परीक्षा पास नाही आता तुम्हाला प्रमोशन नाही. या वयात तुम्हाला परीक्षा देणे कठीण जाईल. मलाही वाईट वाटायचे कुणीतरी आपल्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतय असे वाटायचे. मग मनाशी विचार केला आता तर सी. टी. ई. पास होऊनच दाखवायचे.चॅलेंज स्वीकारले.

आता अभ्यास कसा करायचा? काय करायचे? काही माहीत नाही. पुस्तक मागवलं. पुस्तक पाहून तर चक्करच आली. अगदी लहान टाईप. वर्षभर पारायण केलं तरी पुस्तक वाचून होणार नाही. भला मोठा ठोकळा. पण मनात जबरदस्त ईच्छाशक्ती. पुस्तक स्वीटीला म्हणजेच माझ्या शिक्षिका मुलीला दिल. म्हटलं मला शक्य नाही हे पुस्तक वाचणे. डोळे जातील तूच वाच. जे काही यू ट्यूबवर व्हिडिओ येतील फक्त तेव्हढेच ऐकायचे. पण एकदा ऐकले की, परफेक्ट डोक्यात बसायचे. परत ऐकायची गरज नाही. हे करत असताना कुठलाही कार्यक्रम चुकवला नाही. सर्व ठिकाणी हजेरी लावली. अभ्यासाचा बाऊ केला नाही. विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष केले नाही.

प्रश्नपत्रिका संच आणले. ५० प्रश्नपत्रिका सोडवल्या. प्रत्येक वेळेस ४ प्रश्नपत्रिकांचे मिळून ८० च्या पुढे मार्क्स पडायचे. राहिला भाषा विषय तो तर माझ्या हाताचा मळ. त्याला मला सहज २० मार्क्स पडतील असे वाटायचे. एक महिन्यात ५ विषय कसे सोडवायचे? भाषा सोडून सर्व हिंदी भाषेत. महिन्यात अभ्यास करायचा कसा? अभ्यास कसा कव्हर व्हायचा?; पण जिद्द सोडली नाही.शिक्षकी पेशाला न्याय द्यायचा होता. महिन्यात रात्रंदिवस अभ्यास केला. होता होईल तसा सर्व विषयांना हात घातला. आणि परीक्षेचा तयारी केली. आता प्रतिष्ठेचा प्रश्न होता. प्रमोशन गेले उडत; पण पास होणे माझ्यासाठी महत्त्वाचे होते.


म्हणून माझे सर्व जगच परीक्षामय झाले होते; पण हे सर्व करत असताना एकही दिवस रजा काढली नाही की, विद्यार्थांचे नुकसान होऊ दिले नाही. सर्व मुलांच्या शुभेच्छासुद्धा माझ्या पाठीशी होत्याच. मुले म्हणायची, मॅडम नका काळजी करू. तुम्ही पासच होणार व तेही चांगल्या मार्कांने. माझ्या आधी माझ्या विद्यार्थ्यांनाच माझी पास व्हायची काळजी.

....आणि परीक्षेचा दिवस उजाडला. तयारी झाली. भूषणाला म्हणालो आम्ही तुझ्याकडे येतो. तो म्हणाला स्पेशल गाडी करून या. गणेशाचे दर्शन घेतले. मनात



खूप मोठी आशा घेऊन निघाले. परीक्षेच्या आधी दोन दिवस अभ्यास सोडून दिला. डोळे फार दुखायचे म्हटलं जरा शांतच रहावे.

परीक्षा केंद्रावर पोहचलो. मला पुणे येथील हडपसर केंद्र होते. घरून नेलेला डबा खाल्ला. मनात धाकधूक. काय होईल? कसं होईल? पण निर्धार पक्का होता. पेपरच्या आधी अर्धा तास आत घेणार तोच मला घाम फुटला. दोन वेळेस बाहेर जावे लागले. घशाला कोरड पडली. साहेबांनी पाणी आणून दिले व म्हणाले, चल आपण पुण्यात फिरायला जाऊ. हे सर्व सोडून दे. मी परीक्षा देणारच यावर ठाम होते. योगायोगाने कान्हूर पठार येथे कार्यरत असलेल्या वाघ मॅडम व मी एकाच केंद्रावर



वीरभूमी
**सौ. मंजुश्री शिवाजी वाळुंज**
प्राथमिक शिक्षिका

होतो. त्यांनी धीर दिला.साहेबांचे म्हणणे, नको तो पेपर व ती परीक्षा. तू इथवर आली त्यातच तू पास झाली. या वयात कोण करते एवढी डेअरिंग. मी जरा वेळ शांत बसले. स्वर्गवासी आईचे स्मरण केले. मनात म्हणाले, आजपर्यंत माझ्या प्रत्येक सुखदुःखात तू साथ दिलीस तशी आजही दे. मनोमन प्रार्थना केली.

मनात उत्साह आला व उठले. पेपरसाठी तयार झाले. साहेबांना सांगितले तुम्ही माझी काळजी करू नका, आई व बाप्पा आहेत माझ्या बरोबर. मी व्यवस्थित पेपर देईन. हॉलमध्ये गेलो. तर भलतेच ऐकले. तिथल्या मॅडम म्हणाल्या, तुम्हाला अंगावरचे दागिने काढावे लागतील, परत एक धक्का. हो – ना करता करता निर्णय घेतला काढू दागिने. आता बांगड्या काढा म्हणाल्या. मी विरोधच केला बांगड्या काढायला. वाद विवाद झाला. नाहीच काढणार बांगड्या असे ठणकावून सांगितले. मोकळ्या हाताने मी पेपर लिहूच शकत नाही. आता तर खरेच पेपर न देताच घरी जाईन. हो – ना करता करता राहू द्या, तुमच्या बांगड्या त्या मॅडम म्हणाल्या.तुम्ही पेपरला जाऊ शकता. तेथे माझा विजय झाला. साहेबांना बोलावले. सर्व दागिने त्यांच्याकडे दिले आणि आश्चर्य म्हणजे जवळ जवळ सर्वच महिलांनी दागिने सांभाळायला आपल्या आमच्या साहेबांजवळ दिले.

अजून एक गोष्ट म्हणजे आमच्या सेंटरवर सर्व महिलाच होत्या. परीक्षा हॉलकडे निघाले.तर समोरच सुंदर अशी बाप्पाची मूर्ती स्थानापन्न असलेली दिसली. रांग सोडून बाप्पाकडे निघाले तर मॅडम ओरडल्या, कुठे चालल्या मॅडम? मी म्हणाले, मला बाप्पाचे दर्शन घ्यायचे आहे. अगदी त्याच्या पायावर डोके ठेऊन. त्या म्हणाल्या लांबूनच घ्या. मी नाही म्हणाले. कुणालाही न जुमानता सरळ जाऊन बाप्पाच्या चरणावर लोटांगण घातले. मॅडम बघतच राहिल्या. मला माहीत होते इथून बाहेर काढून दिले तरी आपले काही या परीक्षेवाचून अडत नाही.

हॉल मध्ये प्रवेश केला. परीक्षा देण्यासाठी सर्व महिला आणि सुपरविजनलाही दोन महिलाच होत्या. ते पाहून हायसे वाटले. मनावरचे दडपण कमी झाले. अर्धा तास आधी आत घेतले आता काय करायचे? हॉलमधील महिलांच्या ओळखी झाल्या. मग मनोरंजन म्हणून माझ्या कविता अगदी जवळ मोबाईल नसताना सर्वांना म्हणून दाखवल्या. सर्वांना खुश केले. वातावरण प्रसन्न झाले. हॉलमधील सर्व महिला मनावरचे दडपण दूर सारून आनंदाने परीक्षेचा पेपर देण्यासाठी मनातून तयार झाल्या.

मला नाही वाटत माझ्या हॉलमधील एकाही महिलेचा पेपर राहिला असेल. सर्व पासच होणार कारण अभ्यासच तसा केला होता. पेपर हातात मिळाला. बापरे एवढा मोठा पेपर? मनात परत प्रश्नचिन्ह. मोठमोठाले प्रश्न, वेळ कसा पुरणार? परत काळजी सुरू. पण नेटाने पेपर सोडवायला घेतला. खरे सांगू पेपरमध्ये डोकं घातल्यावर वर पाहिलेही नाही.

क्रमवार प्रश्न सोडवले. येत असो अथवा नसो. प्रश्न वाचला उत्तर शोधले की, लगेच गोल काळा आणि प्रश्नपत्रिकेत खूण. नवलाईची गोष्ट म्हणजे लहान मुलांसारखी घाईगडबडीत सोपे प्रश्न चुकवले. साडेचारलाच पेपर सोडवून तयार. झाला ना पेपर.! इतरांना वेळ पुरत नाही व मी अर्धा तास आधी पेपर सोडवला. परत शंका आता काय होईल? पण सर्व संपले होते. आता काय होईल ते बघू. परत परत गोल मोजले. प्रत्येकी तीसच आहेत का? बाहेर आले. साहेब उभेच होते. म्हटले आमचा फोटो काढा. त्यांनी फोटो काढला. आठवण म्हणून वयाच्या ५७ व्या वर्षी परीक्षा दिल्याची. गाडीत बसलो. प्रश्नपत्रिका घेतली उत्तरे तपासायला. साहेबांनी प्रश्नपत्रिका ओढून घेतली व लॉक करून ठेवली. म्हणाले जे झाले ते झाले. आता यावर चर्चा नको. रिलॅक्स रहा.

खरे सांगायचे झाले तर गणित माझा जरा नावडता विषय. म्हटलं तर जास्त भाषेवर प्रभुत्व आहे माझे. त्यात कव्हर करू मार्क असे मला वाटायचे. गणिताकडे मी दुर्लक्ष करायची. गणिताला ५ मार्क पडले तरी बस. असे मला वाटायचे पण साहेबांना माहीत होते मला गणित आवडत नाही. त्यांनी परीक्षेच्या आधी ८ दिवस गणित विषय मला कंटाळा आला तरी सोडवून घेतला समजावून सांगितला. कारण आजपर्यंत सर्व सेवा इ.१ ली ते ४ थी च्या वर्गावर व शाळेवर केली. आश्चर्य म्हणजे मला गणितात ५ मार्क पडण्याऐवजी ३० पैकी १६ मार्क पडले.

माझ्या प्रत्येक यशात साहेबांचा तितकाच सिंहाचा वाटा आहे. म्हणून मी त्यांना मनापासून धन्यवाद देईन. परीक्षा तर झाली. आता अन्सर कीचे डोहाळे लागले. आली एकदाची अन्सर की. तपासला पेपर मार्कही चांगले पडले. पण मन मानत नव्हते. कुणाला मार्क सांगू की नको? सांगितले आणि तेवढे नाही पडले तर काय? या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून सर्वांचे मार्क विचारले सर्वांनी मोकळेपणाने मार्क सांगितले; पण माझी हिंमत होईना माझे मार्क सांगायची. मी पास होईल एवढेच म्हणायची. पण मला चांगले मार्क पडले व काठावर पास न होता अगदी उत्तुंग यश मिळवलं. हे कसे सांगू? नाही अस झालं तर मला वय झालं अस म्हणतील म्हणून गप्प राहिले. ज्यांना ज्यांना मी मार्क सांगितले नाही व त्यांचे मार्क मी विचारले. त्या सर्वांची मी मनापासून माफी मागते.

आता उत्सुकता निकालाची होती. निकाल कधी येतो याची वाट पहात पहात डोळे बारीक झाले. व आज तो सोन्याचा दिवस उगवला व खरे मार्कशिट माझा फोटो असलेले मिळाले. मला चांगले मार्क पडले. विश्वासच बसत नव्हता. मी अभ्यासासाठी १०१% दिले व मला मार्कही १०१ च पडले.

मी पास झाले अगदी चांगल्या मार्कांनी. मला मदत करणाऱ्या सर्वांचीच मी ऋणी आहे. सर्वात जास्त ऋणी मी त्या मैत्रिणीची आहे की, जिने मला अगदी ध्यानीमनी नसताना शेवटच्या टप्प्यात फॉर्म भरायला प्रोत्साहन दिले. सांगायचे तात्पर्य व लेखन करण्याचा उद्देश हाच की जो शिक्षण खात्यात आला. तो प्रत्येकजण हिरा आहे गारगोटी नाही. हिरा तो हिराच असतो तो कुठेही टाकला तरी चमकतोच.

सगळ्यांचा नाद करा पण एका प्रामाणिकपणे नोकरी करणाऱ्या शिक्षकाचा नाद करू नका की, जो कोणतेही काम येवो अगदी आनंदाने करतो व नुसते करीतच नाही तर ते यशस्वीरित्या पार पाडतो. त्याला टी. ई. टी. काय किंवा सी. टेट. काय किंवा शिक्षण खात्यातील कोणतीही परीक्षा काय तो पासच होणार. फक्त जरा वयाचा विचार करा म्हणावं. चार तास एका जागेवर बसणे या वयात हा कोणता कायदा? हा कोणता न्याय.?

**प्रयत्ने रगडिता वाळू, तेलही गळे**

शिक्षकाला कमी नका लेखू. डॉक्टर, वकील, इंजिनिअर व सर्वच क्षेत्रातले अधिकारी कोण घडवतो शिक्षकच ना? जनगणना, मतदान, पोषण आहार, किंवा इतर कोणतेही अशैक्षणिक काम असो का तुम्हाला शिक्षकाचीच आठवण येते? मग त्यापुढे टी. ई. टी. ची काय बिशाद? शिक्षण खात्यात आलेलो आम्ही सर्व हिरे आहोत हे लक्षात ठेवा. कोणतीही लढाई आम्ही हरत नाही जिंकतोच. मी तर म्हणेल की, शिक्षकाला जशी टी. ई. टी. ची सक्ती केली ना तशी प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांनाच करा मग बघू कुणाचे पारडे जड भरते. सर्व एका पारड्यात घातले व शिक्षक एका पारड्यात घातला तर मी छातीठोकपणे सांगेन की, शिक्षकाचेच पारडे जड ठरेल. यात तिळमात्रही शंका नाही.

माझे भाचे आदरणीय विष्णू औटी साहेब हे अतिशय नाजूक परिस्थितीतून शिक्षक झाले व पुढे यू.पी.एस.सी. परीक्षा देऊन आज आय.आर.एस पदावर कार्यरत आहेत. ते पण शिक्षकच आहेत ना. ***अरे मोडेन पण वाकणार नाही. असाच आमचा बाणा. पाठीवर थाप देऊन फक्त लढ म्हणा.***

कोणतेही आव्हान स्वीकारायला शिक्षक तयार. सगळ्यांचा नाद करा पण शिक्षकाचा नाही. माझ्या सर्व शिक्षक बंधू भगिनींना माझी कळकळीची विनंती आहे. टी. ई. टी. अगदी आपल्या हातचा मळ आहे घाबरू नका. आनंदाने व शांत मनाने परीक्षा द्या यश आपलेच आहे. पुढील काळात परीक्षा देणाऱ्या सर्वांनाच अगदी मनापासून शुभेच्छा!

यशस्वी भव !

***(हा लेख माझ्या सर्व टी.ई. टी.परीक्षेच्या त्रासाने त्रस्त असलेल्या शिक्षक बंधू भागिंनीच्या चरणी समर्पित)***

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS



## अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थांची इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाडमध्ये दमदार कामगिरी

**● अकोले । वीरभूमी–**

मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंटरनॅशनल गणित ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा मान उंचावली आहे. विद्यार्थ्यांनी एकूण १७ सुवर्णपदक मिळवून यश संपादन करत आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटवला. या यशामध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत कठीण गणितीय प्रश्नांना समर्थपणे सामोरे जात उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या स्पर्धेमध्ये एकूण ८७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये १७ विद्यार्थांनी सुवर्णपदक मिळवले तर उर्वरित ७० विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मानांकन व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशामागे विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांसोबत सर्व गणित शिक्षक, पालक यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या अल्फोन्सा डी., पर्यवेक्षक सानप पराग, काउन्सलर आरती जाधव तसेच सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले.

## शिक्षक भारतीच्या आंदोलनाला यश; थकीत वेतन देयकांचा मार्ग मोकळा!

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गेल्या दोन वर्षांपासून आपल्या हक्काच्या वेतनासाठी लढा देणाऱ्या शिक्षकांसाठी अखेर आनंदाची बातमी आली आहे. 'शिक्षक भारती' संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि आक्रमक आंदोलनांपुढे प्रशासनाला झुकावे लागले असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यायालयीन थकीत देयके मंजूर करण्यात आली आहेत. संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या लढ्यामुळे जिल्हयातील शेकडो शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. दोन वर्षांचा प्रदीर्घ लढा आणि आंदोलनांचा रेटा. शिक्षक भारती संघटनेने गेल्या दोन वर्षांपासून थकीत वेतनाचा प्रश्न लावून धरला होता. केवळ निवेदने देऊन न थांबता, संघटनेने प्रशासनाला वारंवार जागे केले. ऑक्टोबर २०२५: शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथे विराट धरणे आंदोलन करून प्रशासनाला इशारा देण्यात आला होता. मार्च २०२६: नुकतेच शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे झालेल्या 'आक्रोश आंदोलनाने' प्रशासकीय यंत्रणेची झोप उडवली, ज्याचा सकारात्मक परिणाम आता पाहायला मिळत आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी न्यायालयीन तांत्रिक बाबी आणि प्रशासकीय स्तरावर प्रभावी मांडणी केली. वेतन हा शिक्षकांचा घटनात्मक हक्क आहे आणि तो मिळवून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, हा त्यांचा निश्चय अखेर यशस्वी ठरला आहे. त्यांच्या या अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळेच अनेक वर्षांपासून रखडलेली बिले आता मंजूर झाली आहेत. देयके मंजूर झाल्याची बातमी समजताच अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे. जे काम गेल्या कित्येक वर्षांपासून रखडले होते, ते केवळ शिक्षक भारतीच्या एकजुटीमुळे आणि सातत्यपूर्ण लढ्यामुळे शक्य झाले, अशा भावना शिक्षक व्यक्त करत आहेत. संघटनेच्या या यशामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, जिथे अन्याय होतो तिथे शिक्षक भारती खंबीरपणे उभी राहते. लढा यशस्वी करण्यासाठी राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, रूपालीताई बोरुडे, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. हे यश केवळ एका व्यक्तीचे नसून प्रत्येक त्या शिक्षकाचे आहे जो या लढ्यात आमच्या सोबत खांद्याला खांदा लावून उभा राहिला. प्रशासनाने आता उर्वरित देयकेही विनाविलंब निकाली काढावीत, अन्यथा आमचा लढा असाच सुरू राहील, असे शिक्षक भारतीचे पुणे विभागीय कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी सांगितले.

# वासुंदे, पळशी, खडकवाडी भागात घरांचे पत्रे उडाले

### बेभान वादळ अन् गारपिटीने जनजीवन विस्कळीत; बळीराजा पुरता कोलमडला!

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात निसर्गाने थैमान घातले आहे. वासुंदे, पळशी, वनकुटे, खडकवाडी आणि वडगाव सावताळ परिसरात बुधवारी सायंकाळी अचानक आलेल्या बेभान वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर पडले आहेत. घरावरील पत्रे उडणे, विजेचे खांब कोलमडणे आणि शेती पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या गारपिटीतून शेतकरी सावरत असतानाच पुन्हा एकदा निसर्गाने घाला घातला. वासुंदे परिसरातील बोकनकवाडी, शिक्री, खडकवाडीतील जांभळवाडी तसेच पळशीतील चिमणीबारव भागात वारे इतक्या वेगाने वाहत होते की बघता बघता उभ्या पिकांचे नुकसान झाले. प्रामुख्याने कांदा, मिरची, झेंडू, टरबूज, डाळिंब, गहू आणि आंबा या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच उन्हाळ्यासाठी साठवून ठेवलेला ज्वारी आणि बाजरीचा वैरणीचा चारा पावसात भिजल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली असून जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

वादळाचा वेग इतका भीषण होता की अनेक भागांत घरांवरील आणि गोठ्यांवरील पत्रे कागदासारखे उडून गेले. वासुंदे येथील बबन बोरुडे यांच्या घराचे पत्रे उडाल्याने त्यांचा पूर्ण संसार रस्त्यावर आला आहे. बन्सी गोवर्धन राठोड यांच्या घरावर झाड कोसळले, तर राजेंद्र शिरतार आणि विठ्ठल जेडगुले यांच्या घरांचे व जनावरांच्या गोठ्यांचे नुकसान झाले आहे. पळशी येथील राघू सोमा मधे आणि बाबाजी किसन जाधव यांची



घरे पडल्याने ही कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. खडकवाडीत राघू केदार, पोपट केदार, बुवाजी जाधव आणि शंकर केदार या गरीब शेतकऱ्यांच्या घरांचे अतोनात नुकसान झाले असून एका किराणा दुकानालाही वादळाचा मोठा तडाखा बसला आहे.

आधुनिक शेतीसाठी बसवलेले सौर पॅनलही या गारपिटीतून सुटू शकले नाहीत. वासुंदे येथील माजी सरपंच रंगनाथ सैद, ताराबाई सैद आणि रामदास शिरतार यांच्या विहिरीवरील सौर पॅनल गारपिटीमुळे तुटले व उडून गेले आहेत, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वाबळे वस्तीवर विजेच्या तारा तुटल्या असून अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. दिलीप भागाजी पाटोळे यांच्या जनावरांच्या गोठ्याचेही मोठे नुकसान झाले आहे. मारुती भालेकर यांच्या कंपाउंडमध्ये विजेचा पोल पडल्याने मोठी भीती निर्माण झाली होती. साहेबराव गुंजाळ यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

या भागात शेतीसोबतच मोठ्या प्रमाणावर वीटभट्टी व्यवसाय चालतो, मात्र अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे कच्च्या विटांचे पाणी झाले असून, वीट व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. हवामान खात्याने पुढील २-३ दिवस पुन्हा अशाच पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून बाधितांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. ज्यांची घरे पडली आहेत त्यांना नवीन घरे बांधून द्यावीत आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी आर्त हाक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

हवामान खात्याने पुढील २-३ दिवस पुन्हा अशाच पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून बाधितांना आर्थिक मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. ज्यांची घरे पडली आहेत त्यांना नवीन घरे बांधून द्यावीत आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी आर्त हाक ग्रामस्थांनी सरकारला दिली आहे.

### प्रशासनाने आता कागदी घोडे नाचऊ नका!

■ निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. हाताशी आलेला कांदा, फळबागा आणि राहती घरेही गारपिटीने हिरावून नेली आहेत. प्रशासनाने आता केवळ कागदी घोडे न नाचवता, तातडीने या भागाचे पंचनामे करून थेट आर्थिक मदत द्यावी, हीच आमची मागणी आहे; अन्यथा बळीराजा पूर्णपणे कोलमडून पडेल. अशी मागणीच माजी चेअरमन दिलीप पाटोळे यांनी केली आहे.

दोन दिवसांच्या वादळी पावसाने अनेकांचे संसार उघड्यावर आणले आहेत. घरांचे पत्रे उडाले असून पावसाच्या भीतीमुळे रात्र जागून काढावी लागत आहे. सरकारने केवळ पिकांचीच नाही, तर ज्यांची घरे पडली आहेत आणि ज्यांचे सौर प्रकल्प फुटले आहेत, त्यांनाही विशेष नुकसान भरपाई देऊन आधार द्यावा, ही विनंती आहे.

– **सचिन सैद,** वासुंदे, शिक्री)

## राजूरच्या नवाळी समाजाचा 'देवकाठी' सोहळा उत्साहात

**● अकोले । वीरभूमी–**

निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या राजूर नगरीत श्रद्धेचा जनसागर उसळला होता. निमित्त होते, महर्षी वाल्मिक ऋषी विश्वस्त मंडळ व नवाळी समाज यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक 'देवकाठी' यात्रोत्सवाचे. पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा वारसा आजही तितक्याच निष्ठेने जपणाऱ्या नवाळी समाजाने या उत्सवातून समाजहित आणि एकात्मतेचे दर्शन घडवले.

हा केवळ एक उत्सव नसून ती एक अखंड चालत आलेली साधना आहे. राजूर ते रंधाफॉल या मार्गावर निघालेल्या या 'देवकाठी' दिंडीत ५ वर्षांच्या बालकांपासून ते ७० वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्वजण सहभागी झाले होते. कडाक्याचे ऊन किंवा प्रवासाचा



थकवा यांच्यावर श्रद्धेने मात करत, 'भंडारा' उधळत निघालेली ही दिंडी पाहताना भक्तीचे एक अनोखे चैतन्य अनुभवायला मिळाले.

गेल्या आठ वर्षांपासून या यात्रोत्सवाला समाजकारणाची जोड देण्यात आली आहे. देवकाठी स्थानापन्न झाल्यावर होणारी महाआरती आणि त्यानंतर सातशे ते आठशे भाविकांनी घेतलेला महाप्रसादाचा लाभ, हे नवाळी समाजाच्या दातृत्वाचे प्रतीक ठरले.

पायी दिंडीचा प्रवास: राजूर-केळुंगण-माळेगाव-कातळापूर मार्गे रंधाफॉल येथील घोरपडा देवीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी निघालेली ही दिंडी शिस्त आणि उत्साहाचा आदर्श घालून देते.

परंपरा ही केवळ जपण्यासाठी नसते, तर ती पुढच्या पिढीला संस्कार म्हणून देण्यासाठी असते. नवाळी समाजाने जपलेली ही देवकाठीची परंपरा आजच्या काळात समाज बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे.

नवाळी परिवाराचा वतीने विविध सरकारी पदावर असलेल्या अधिकारी यांचा गुणगौरव करण्यात आला. या उत्सवात केवळ नवाळी परिवारच नाही, तर संपूर्ण पंचक्रोशीतील समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जात-पात आणि भेदभावा पलीकडे जाऊन श्रद्धेच्या एका धाग्यात सर्वजण गुंफले गेले होते. पूर्वजांनी दिलेला हा वारसा भविष्यातही असाच तेवत ठेवण्याचा संकल्प यावेळी प्रत्येक भाविकाच्या डोळ्यात दिसत होता.

## प्रज्ञाशोध परीक्षेत जय बजरंग प्राथमिक विद्यालयाचे यश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

डॉ. हेडगेवार प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परीक्षेत आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेच्या जिल्हा गुणवत्ता यादीत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानाचे स्थान पटकावत उज्वल कामगिरी केली आहे.

या स्पर्धात्मक परीक्षेत इयत्ता चौथीतील चि. दर्शन गणेश घुले याने जिल्ह्यात १६ वा क्रमांक मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. तसेच इयत्ता पाचवीतील कु. श्रीलेखा गणेश आडसरे हिने १७ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. इयत्ता सातवीतील चि. अभिषेक प्रभाशंकर कुशवाह याने जिल्ह्यात १३ वा क्रमांक मिळवला, तर चि. सिद्धेश अमोल क्षीरसागर याने १५ वा क्रमांक पटकावून विद्यालयाच्या यशात भर घातली. या यशाबद्दल आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्रजी फिरोदिया, सहसचिव उमेश गांधी, व्यवस्थापक आशुतोष घाणेकर आणि सहव्यवस्थापक अमोल तोडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरित केले.

## विकासाची पंचसूत्री राबविण्यासाठी सहविचाराची उपमहापौर जाधव यांची ग्वाही

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगरच्या सर्वांगीण विकासाची पंचसूत्री सहविचारातून पुढे नेण्याचा मनोदय नूतन उपमहापौर धनंजय जाधव यांनी त्यांच्या सामाजिक संस्थांनी आयोजिलेल्या सत्कारास उत्तर देताना व्यक्त केला.

ॲड. जाधव म्हणाले की, पायाभूत नागरी सुविधा, महापालिकेच्या शाळांमधून मिळणारे शिक्षण, मनपाच्या दवाखान्यांमधील आरोग्य सुविधा, खेळ - खेळाडू आणि क्रीडांगणांच्या विकासाचे सातत्यपूर्ण उपक्रम आणि स्थानिक नगरी संस्कृती विकासाची पंचसूत्री राबविणे, ही महापालिकेच्या आगामी कारभाराची दिशा असेल.

येथील क्रीडामहर्षी मेजर दिनुभाऊ कुलकर्णी क्रीडा मंडळाने नगर मधील सर्व खेळाडू आणि क्रीडा संस्थांतर्फे नूतन उपमहापौर जाधव त्यांच्या पत्नी आणि माजी नगरसेविका सौ. सुप्रिया जाधव यांचा हृद्य नागरी सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर खेडकर आणि प्रमुख मार्गदर्शक निवृत्त प्राचार्य डॉ. खासेराव शितोळे होते. स्नेहालय संस्थेमधील रवींद्रनाथ टागोर सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

ॲड. जाधव यावेळी म्हणाले की, आपले आजोबा दत्तू खलिफा, आजी नानीबाई, वडील कृष्णा यांच्याकडून नगरसेवेचा वसा आणि वारसा मिळाला. त्यामुळे राजकारणात संधीची अपेक्षा न करता सतत लोकांसोबत राहून त्यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले. अहिल्यानगर हे मूलतः कष्टकरी, गरीब आणि मध्यमवर्ग यांचे शहर आहे. येथे रहिवाशांना आर्थिक झळ न देता दर्जेदार पायाभूत



सुविधा देण्याला आपण महत्व दिले आणि देणार असल्याचे उपमहापौरांनी सांगितले.

क्रीडामंडळाचे सचिव नंदेश शिंदे यांनी प्रस्तावना केली. सौ. मनीषा शिंदे यांनी जाधव दांपत्याच्या मानपत्र यांचे वाचन केले. स्नेहालयाचे संचालक हनीफ शेख यांनी काही प्रमुख नागरी समस्यांवर नागरिकांतर्फे मांडणी केली. आदर्श शिक्षक भाऊसाहेब कबाडी आणि अरुण पवार यांनी सूत्रसंचालन केले.

दत्ता पांचाळ यांनी संतांचे अभंग कार्यक्रमात सादर केले.

# जन जाती कल्याण आश्रमाशी जोडलो गेल्यामुळे पदमश्री पर्यंत पोहोचलो

### पदमश्री चैत्रराम पवार । अकोले मधील जनजाती कल्याण आश्रम येथे स्वयंपाकगृह, भोजन कक्ष व अभ्यासिकेचे उदघाटन

**● अकोले । वीरभूमी–**

जनजाती कल्याण आश्रमाशी जोडलो गेल्यामुळे मी पदमश्री पर्यंत पोहोचू शकलो असे प्रतिपादन पदमश्री चैत्रराम पवार यांनी केले.

अकोले येथील जन जाती कल्याण आश्रम येथे स्वयंपाक गृह, भोजनगृह व अभ्यासिका यांचे उदघाटन पदमश्री चैत्रराम पवार यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, प्रा.डॉ. सुनील घनकुटे, प्रा.डॉ.कुंडलिक पारधी, प्रांत संघटन मंत्री विशाल भरुख, प्रांत सचिव शरद शेळके, पुणे विद्यापिठाचे प्रा. कृष्णा भंडलकर, डॉ.अनिल पारधी, युवराज लांडे, कल्याण आश्रमचे कोंडेकर काका, सौ.वैशालीताई देशपांडे, बाळासाहेब मुळे, प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, किशोर बापू टेके, रामुसेठ रासने, योगेश देशमुख, कोषाध्यक्ष वैभव व्यवहारे, मोरेश्वर धर्माधिकारी, गृहपालक रामदास सोनवणे, मॉर्डन हायस्कूलच्या प्राचार्या चित्रा कांबळे, उपप्राचार्य सुधीर जोशी, चित्रकार मिनानाथ खराटे, गणेश जोशी, माने सर, मंदा सोनवणे, विजया शेळके, ऋषी जाधव, संगीता कचरे, अधीक्षक सुनील ठाकरे, महिला, विद्यार्थी आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पदमश्री चैत्रराम पवार पुढे म्हणाले की, सन १९८९-९० मध्ये संघाचे जेष्ठ प्रचारक मुकुंदराव पणशीकर यांच्याशी संपर्क आला. स्वतः एम डी मेडिसिन डॉक्टर असून खेडेगावात झोपडीत राहून त्यांनी समाजसेवा सुरू केली.वनवासी कल्याण आश्रमाशी संपर्क वाढला, प्रचारक म्हणून काम करण्याची संधी मिळाली.कल्याण आश्रम मार्फत सर्व प्रथम राष्ट्र हिताला प्राधान्य दिले जाते. आपण समाजासाठी काय करू शकतो हा विचार सातत्याने असतो. त्यातून प्रेरणा घेऊन लोकांच्या सहभागातून आदर्श गाव निर्माण केले. त्याची दखल केंद्र सरकारने घेऊन पदमश्री पुरस्काराने सन्मानित केले.खरे तर हा पुरस्कार आपल्या सर्वांचा आहे,ज्या जेष्ठानी यात काम केले त्यांनी दिशा दाखवून दिली त्यांचा हा पुरस्कार आहे. मी एक साधा कार्यकर्ता असून मला तसेच राहू द्या, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. जनजाती कल्याण आश्रमचे मूळ श्वासत विकास असून त्याची दिशा चुकू देऊ नका, असे मत व्यक्त करीत कल्याण आश्रमाने नेहमीच राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. त्यामुळे सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत गॅस टंचाई लक्षात घेवुन कल्याण आश्रमाच्या माध्यमातून तीन गावामध्ये गॅस वापरायचा नाही हा निर्णय घेतला. व गॅसचा वापर बंद केला. ही बाब केंद्र सरकारच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आमचा शोध घेत आमचा सत्कार केला.

समाजामध्ये देणारे खूप आहेत, हे सातत्याने चालणारे काम आहे. आपण सर्व जण तोलामोलाचे काम करणारे आहोत. समाजाच्या बळावर हे काम चालते. नगर समिती मार्फत गाव जोडता येतील का याचा विचार करावा,त्या सक्षम करणे गरजेचे आहे. ज्येष्ठांनी आपल्याला दिशा दिला, त्याचा हा परिपाक आहे. भविष्यातील पिढी चांगल्या मार्गाने न्यायची आहे, असे मत पदमश्री चैत्रराम पवार यांनी व्यक्त केले.

यावेळी तालुक्यातील ढगेवाडी येथील



भूमिपुत्र व तथा कल्याण आश्रमचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. कुंडलिक पारधी यांनी खडतर जीवन प्रवास सांगितला. व पैसा नसला तरी बुद्धीच्या जीवावर आपण उच्च पदावर पोहोचू शकतो, मात्र त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रा. डॉ. यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारी साठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे सांगितले.

स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन जन जाती कल्याण समितीचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य संतोष कचरे यांनी केले. गृह पालक रामदास सोनवणे यांनी आभार मानले.

# झगडे फाटा-तालुका हद्द रस्ता सिमेंट काँक्रीटचा केल्याशिवाय माझे समाधान नाही

## आ. आशुतोष काळे । शहा-पोहेगाव ३३ केव्ही उच्चदाब वाहिनीचा लोकार्पण सोहळा संपन्न

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव मतदारसंघात राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा महामार्ग तसेच गावांतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर कामे पूर्ण झाली असून वाड्या वस्त्यांवरच्या रस्त्यांना निधी दिला असून रस्त्यांसाठी अजूनही निधी मिळवीत आहे. जरी झगडेफाटा ते तालुका हद्द (भागवतवाडी) पर्यंतच्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १७ कोटी निधी मिळविला असला तरी माझे समाधान झालेले नाही. एन.एच.७५२ जी या राष्ट्रीय महामार्गावर मालेगाव पासून कोपरगाव पर्यंत सावळीविहीर-कोपरगाव सारखा सिमेंट काँक्रीटचा रस्ता कुठेच नाही. सध्या देर्डे फाटा ते भरवस फाटा या रस्त्याचेही सिमेंट काँक्रीटकचे कामे प्रगतीपथावर आहे. त्याच धर्तीवर जोपर्यंत झगडेफाटा ते तालुका हद्दीपर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रीटचा होत नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही असे सुतोवाच करून झगडेफाटा ते वडगावपान रस्ता मलाच करावा लागणार आहे आणि रस्ता मीच करील कारण मी कामाचा माणूस आहे असा ठाम विश्वास आ.आशुतोष काळे यांनी पोहेगाव व पंचक्रोशीच्या गावातील नागरीकांना दिला.

कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव व परिसराचा विजेचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नातून २.६० कोटी निधीतून करण्यात आलेल्या शहा सबस्टेशन ते पोहेगाव सबस्टेशनच्या ३३ केव्ही उच्चदाब वाहिनीचे लोकार्पण व १० लक्ष रुपयांच्या निधीतून साकारलेल्या श्री मयुरेश्वर देवस्थान परिसर विकास (पेव्हिंग ब्लॉक बसवणे) कामाचा लोकार्पण सोहळा गुरुवार (दि.०२) रोजी पोहेगाव येथे आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, पोहेगाव परिसरातील नागरिकांचा आणि शेतकऱ्यांच्या विजेच्या अडचणी सोडविण्यासाठी माजी आमदार अशोकराव काळे यांनी त्यांच्या कार्यकाळात कोळपेवाडी येथे १३२ के.व्ही.ए.चे सबस्टेशन मंजूर करून आणले होते. मात्र २०१४ नंतर कोपरगाव तालुक्यात सत्तांतर होवून हे सबस्टेशन शहा येथे घालविण्यात आले. तरीही या वीज उपकेंद्रावर तालुक्याचा हक्क अबाधित ठेऊन तालुक्यातील कोळपेवाडी व चासनळी ही उपकेंद्रे शहा सबस्टेशनला प्राधान्याने जोडून घेतले असून आज पोहेगाव वीज उपकेंद्र देखील शहा सबस्टेशनला जोडले गेल्याने परिसराचा विजेचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आहे.

निळवंडे कालव्याच्या लाभक्षेत्रातील ११ गावांना निळवंडे धरणाचे पाणी मिळाले पाहिजे आणि निळवंडे धरण ग्रस्त भागातील नागरिकांचे पुनर्वसन व्हावे यासाठी कर्मवीर शंकरराव काळे साहेबांच्या अध्यक्षतेखाली काळे समितीची स्थापना करण्यात आली होती. पुनर्वसन वेळेत झाल्यामुळे धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण झाले असून राज्यात एकमेव निळवंडे धरणाचे काम पूर्ण होण्याच्या अगोदर धरणग्रस्त नागरिकांचे पुनर्वसन झाले होते. जो पर्यंत निळवंडे धरणाचे पाणी लाभ क्षेत्रातील गावांना मिळत नाही तो पर्यंत विरोधकांनी ज्या योजनेला न परवडणारी योजना म्हणून गुंडाळून ठेवली होती तीच उजनी उपसा जलसिंचन योजना माजी आमदार अशोकराव काळे यांनी या योजनेचे थकीत वीज बिल स्वखर्चातून भरून सुरु ठेवली त्यामुळे २००४ ते २०१४ या कालावधीत या गावातील नागरिकांना पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याची अडचण भासली नाही. मात्र २०१४ ते २०१९ दुर्दैवाने हि योजना पुन्हा बंद ठेवली. मात्र २०१९ पासून मी पुन्हा उजनी उपसा जलसिंचन योजना सुरु केली यातून टप्पा १ मधील गावांना पाणी पुरवठा केला जात आहे. टप्पा २ मधील गावांना निळवंडे धरणाचे पाणी उपलब्ध झाले असून अकरा गावांचा पाण्याचा प्रश्न मिटला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार, उपकार्यकारी अभियंता डी. डी. पाटील, कनिष्ठ अभियंता टर्ले, गवाळे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रविण शिंदे, संचालक शंकरराव चव्हाण, राहुल रोहमारे, वसंतराव आभाळे, प्रशांत घुले गंगाधर औताडे, माजी व्हा. चेअरमन काकासाहेब जावळे, सचिन रोहमारे, सुनिल शिंदे, पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार पतसंस्थेचे चेअरमन देवेन रोहमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संजय शिंदे, अरुण येवले, वीरेंद्र शिंदे, भाऊसाहेब माळशिखरे, गौतम बँकेचे संचालक बाबुराव थोरात, बापूसाहेब जावळे, बापूसाहेब वक्ते, शरद होन, उत्तमराव भालेराव, जिनिंग प्रेसिंगचे व्हा. चेअरमन शंकरराव गुरसळ, गोदावरी खोरेचे संचालक दिलीप शिंदे, प्रदीप कुऱ्हाडे, रांजणगाव देशमुखचे सरपंच गजानन मते, डाऊचचे सरपंच संजय गुरसळ, चांदेकसारेचे सरपंच किरण होन, बहादरपूरचे सरपंच गोपीनाथ रहाणे, शहापूरचे सरपंच रमेश डांगे, घारीचे सरपंच संदिप पवार, आदींसह पोहेगाव व पंचक्रोशीतील उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> जे सबस्टेशन शहाला झाले ते सबस्टेशन कोळपेवाडीला होणार होते. त्यासाठी आपल्या कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याने जवळपास सात एकर जागा एमएसबीला दिली होती. त्यामुळे कोपरगाव तालुक्याचा विजेचा प्रश्न पण सुटला असता आणि सभासद शेतकऱ्यांना ऊस दरात थोडे पैसे जास्त पण मिळाले असते. परंतु ज्यांनी ज्यांनी २०१४ ते २०१९ सत्तेत राहूनही ज्यांच्याकडे सांगण्यासारखे एकही ठोस काम नाही त्यांनी मा. आ. अशोकराव काळे यांना श्रेय मिळू नये यासाठी हे सबस्टेशन शहाला घालविले.
>
> **– आ. आशुतोष काळे**



# राजापूर-माठ शिवरस्त्याचे सीमांकन यशस्वी; प्रशासन व शेतकऱ्यांच्या समन्वयाला मोठे यश

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेअंतर्गत राजापूर व माठ गावांदरम्यान दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या शिवरस्त्याचे सीमांकन अखेर यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. प्रशासन, शेतकरी आणि चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही महत्त्वाची कारवाई शक्य झाली.

श्रीगोंदा उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार सचिन डोंगरे तसेच भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली. राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी प्रत्यक्ष स्थळी सीमांकनाची कार्यवाही पूर्ण केली. या वेळी चळवळीचे राज्य कायदे सल्लागार ॲड. अजय कडूस पाटील, मंडळ अधिकारी मगर एस. एम. (देवदैठण), ग्राम महसूल अधिकारी धर्माळे ए. एल. (राजापूर) व कुसेकर समीर (माठ) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बेलवंडी पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल श्री. गांगुर्डे यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया शांततेत पार पडली.

कारवाईदरम्यान दोन्ही गावांतील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करत कोणताही वाद न होता हद्द निश्चितीची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यामुळे हा उपक्रम आदर्श ठरला आहे. या यशस्वी कारवाईबद्दल दादासाहेब जंगले पाटील यांनी ग्रामस्थ, शेतकरी व सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले.



# महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरणमार्फत गोदावरी नदी संवर्धन होवून पर्यावरणाचे होणार रक्षण : आ.आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

कोपरगाव मतदार संघातून वाहणारी पवित्र गोदावरी नदीचे संवर्धन व्हावे याबाबत महायुती शासनाने पाठपुरावा सुरु होता. त्याबाबत बुधवार (दि.०१) रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत महायुती शासनाने नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी आणि नद्यांना पुनरुज्जीवित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला असून त्या माध्यमातून गोदावरी नदीचे संवर्धन होवून पर्यावरणाचे रक्षण होणार असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

पर्यावरणाचे रक्षण होवून गोदावरी नदी संवर्धनासाठी महायुती शासनाने केलेल्या पाठपुराव्यातून पर्यटन विभागाकडून २० कोटी निधी मंजूर करून आणला आहे. या २० कोटी निधीतून दोन किलोमीटर पर्यंतच्या गोदावरी नदी पात्राची स्वच्छता करून गाळ काढणे, प्रदूषण रोखण्यासाठी निर्माल्य घाट बांधणे, जॉगिंग ट्रॅक आणि पथ रस्त्यांची निर्मिती करणे, एक किलो मीटर पर्यंत ड्रेनेज डायव्हर्शन आणि स्टोन पिचिंग करणे, रिटेनिंग वॉल आणि गॅबियन वॉल, स्वच्छता गृह बांधणे, वनीकरण आणि वृक्षारोपण करणे, कचरा कुंडी व नागरिकांना बसण्यासाठी बाक बसविणे, नाला साफसफाई आणि प्लास्टिक कचऱ्याची तपासणी, घनकचरा तपासणी यंत्रे तसेच सोलर स्ट्रीट लाईट बसविणे अशी विविध कामे होणार आहे.



पवित्र गोदावरी नदी कोपरगावकरांना मिळालेली अनमोल देणगी असून या गोदामाईच्या काठी पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक परंपरा लाभलेले कोपरगाव शहराबरोबरच मतदार संघातील अनेक गावे वसलेली आहेत. पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या कोपरगाव शहराला वळसा घालणाऱ्या पवित्र गोदावरी नदीचे देखील संवर्धन होणे अत्यंत गरजेचे होते. पुढील वर्षी नासिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर महायुती शासनाने नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी आणि नद्यांना पुनरुज्जीवित करण्यासाठी राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यामुळे निश्चितपणे पर्यावरणाचे रक्षण होणार आहे.

आपली गोदावरी नदी प्रदूषण मुक्त होवून पर्यावरणाचे रक्षण व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन योजनेत गोदावरी नदीचा समावेश केल्याबद्दल असंख्य पर्यावरणप्रेमी व कोपरगाव मतदार संघातील जनतेच्या वतीने ह्या निर्णयाचे स्वागत करून महायुती शासनाचे आमदार आशुतोष काळे यांनी आभार मानले आहे.

# नगरसेवक देवा पवार यांच्या पुढाकाराने पाथर्डीतील प्रभाग क्र. ९ मध्ये विकासकामांना वेग

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधून निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक व नगरपरिषदेतील गटनेते देवा पवार यांनी प्रभागातील प्रलंबित विकासकामांना गती देत नागरिकांच्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे प्रभागात अनेक कामे मार्गी लागत असून नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

पवार यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या आमदार निधीतून प्रभागातील तीन महत्त्वपूर्ण विकासकामांचे उद्घाटन नुकतेच आमदार गर्जे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यामध्ये मुस्लिम समाजाच्या कब्रस्तान परिसरातील रस्ते व पथदिव्यांची सुविधा, बाजारतळातील नगर अर्बन बँक ते चिंचपूर रोडपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण तसेच जुना शिरसाटवाडी रोडवरील महादेव मंदिर परिसरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण या कामांचा समावेश आहे.

याशिवाय प्रभागातील माणिकदौंडी रोड, मेहेर टेकडी परिसर, तसेच रावळ समाज स्मशानभूमी येथे पथदिवे बसविण्यात आले आहेत. एडके कॉलनीतील संभाजीराजे नगर परिसर, चिंचपूर रोडवरील टकिया मस्जिद परिसर येथे पथदिव्यांची दुरुस्ती व नवीन दिवे बसविण्याचे काम करण्यात आले आहे. हनुमान मंदिरासमोरील जुनी चावडी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

तसेच रावळ गल्लीतील भूमिगत गटारीचे काम, मेहेर टेकडी परिसरातील पांडू भिसे यांच्या घरापासून ईदगाह मैदानापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता, जुनी चावडीचे नूतनीकरण तसेच आंबेडकर नगरमधील भूमिगत गटारीची कामे मंजूर करण्यात आली असून ही कामे लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती देण्यात आली. यासाठी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड यांचे सहकार्य मिळत आहे. प्रभाग क्रमांक नऊ हा क्षेत्रफळाने मोठा प्रभाग असल्याने अनेक विकास कामे प्रलंबित आहेत परंतु आपण ही सर्व प्रलंबित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार असून नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी कायम प्रयत्नशील आहोत व प्रभागातील मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे नगरसेवक देवा पवार यांनी यावेळी सांगितले.



# पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपये नफा : आ. काशिनाथ दाते

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रुपये ५ कोटी ३२ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आ. काशिनाथ दाते यांनी दिली. संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर २५१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल २९५ कोटी ५२ लाख असुन वसूल भाग भांडवल ६ कोटी ५४ लाख, राखीव व इतर निधी २९ कोटी ८३ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप १७५ कोटी २९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १०६ कोटी ९९ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २४८० कोटींची झालेली आहे.



संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई) खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अध्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई आहे. संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोर बँकिंग, मोबाईल बँकिंग, एस एम एस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काळ मिळत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरक कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आर.टी.जी.एस व एन.ई.एफ.टी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

> संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली असून, सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदीसाठी, वाहन खरेदी तसेच गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगारांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती करता यावी यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.
>
> **– सुरेश बोरुडे,** व्हा. चेअरमन, पारनेर ग्रामीण पतसंस्था

# निसर्गाशी मैत्री करा आणि आनंदी रहा : पद्मश्री राहीबाई पोपेरे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

**● अकोले । वीरभूमी–**

हिंद सेवा मंडळाच्या ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर येथे क्रीडा व कला स्पर्धांचे उर्वरीत पारितोषिक वितरण पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले.

याप्रसंगी त्यांनी चिमुकल्यांशी संवाद साधताना निसर्गाचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येकाने आपल्या घराजवळ एक तरी झाड लावले पाहिजे व त्याचे संगोपन केले पाहिजे. नैसर्गीक फळझाडे 'पालेभाज्या' रानभाज्या तुमच्या घरच्या व शाळेच्या परसबागेत वाढविल्या पाहीजेत. घरची परिस्थिती कशीही असो लढायला शिका. सातत्याने पुढे जात रहा. प्रत्येक घरातील कन्या ही त्या घराची, परिसराची लक्ष्मी असते. तिला शिक्षणाच्या प्रवाहात आणले पाहिजे व माझ्यासारख्याच अनेक पद्मश्री या निसर्गसंपन्न अकोले तालुक्याच्या मातीतून पुढे आल्या पाहिजे अशा भावना व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासही झाला पाहिजे यासाठी शाळेत शिक्षक आणि पालकांनी त्यांना संधी उपलब्ध करून दिली पाहिजे तसेच मुलांच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असावा जंक फूड टाळवेत त्याचे आपल्या शरीरावर होणारे दुष्परिणाम राहिमावशींनी मुलांना समजावून सांगितले.

याप्रसंगी इ. ३ री व ४ थी च्या विद्यार्थीनींनी रंगभरण स्पर्धेतून राहिमावशींचे सुंदर रंगभरण केलेले चित्र त्यांना भेट म्हणून दिले. शाळेचे मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी प्रास्ताविक व पदमश्री राहिबाई पोपेरे यांचा संघर्षमय सातत्यपूर्ण जीवन परिचय करून दिला. कोणतीही शाळा न शिकलेल्या राहिमावशी या निसर्गाची शाळा शिकल्या त्यालाच आपले सर्वस्व केले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून हिंद सेवा मंडळाचे कार्यकारिणी सदस्य दिलीपभाई शहा तसेच शालेय संचालिका पुष्पाताई वाणी, सुरेखा धर्माधिकारी, प्रभावती महाले, तसेच महिला पालकांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेच्या चेअरमन स्मिता मुंदडा यांनी भूषविले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय सूचन व आभार शालेय शिक्षिका सोनाली मालवणकर यांनी मानले.

सूत्रसंचालन बाळासाहेब मांडे यांनी केले. यादीवाचन दत्ताभाऊ पोपेरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. अतिशय प्रसन्न वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

